21 MAY 2026

जनप्रवास

# विद्यापीठाच्या ५५ परीक्षा पूर्ण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षा सुरु आहेत. बुधवारी २० रोजी विविध ५५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ६८ परीक्षा केंद्रावर सुरळीत पार पडल्या. या परीक्षांसाठी १३६४ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, २० रोजी पथकाकडून कोल्हापूर जिल्ह्यातून ५ गैरप्रकाराची नोंद झाली आहे. बुधवारी विविध १० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर होऊन आजअखेर ३६६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले. विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष

21 MAY 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण प्रसारासाठी समन्वयकांनी पुढाकार घ्यावा : डॉ. कृष्णा पाटील

**जनप्रवास : कोल्हापूर**

दूरशिक्षणाची संकल्पना समाजातील सर्व घटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी



अभ्यास केंद्र समन्वयकांनी सक्रिय पुढाकार घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले.

या केंद्राच्या वतीने कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील ८९ अभ्यासकेंद्रांतील समन्वयक व लेखनिकांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रवेश प्रक्रियेबाबत ऑनलाइन कार्यशाळा घेतली. त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. पाटील म्हणाले, दूरशिक्षण हे कौशल्याधारित व रोजगाराभिमुख शिक्षण देणारे प्रभावी माध्यम आहे. पात्र विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अभ्यासकेंद्र समन्वयकांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

कार्यशाळेत बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए. तसेच ऑनलाइन एम.बी.ए., एम.एस्सी. (गणित) व एम.कॉम. च्या प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती दिली. उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. प्रवीण लोंढे यांनी ऑनलाइन अर्ज करताना आवश्यक बाबींविषयी, डॉ. प्रसाद दावणे यांनी एबीसी-आयडी तयार करण्याबाबत, तर संतोष देवेकर यांनी डीईबी-आयडी तयार करण्याबाबत मार्गदर्शन केले. समन्वयक डॉ. चांगदेव बंडगर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश बेळीकट्टी यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सूर्यकांत गायकवाड यांनी आभार मानले.

# दूरशिक्षण प्रसारासाठी समन्वयकांनी पुढाकार घ्यावा

## - डॉ. कृष्णा पाटील

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दूरशिक्षणाची संकल्पना समाजातील सर्व घटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी अभ्यास केंद्र समन्वयकांनी सक्रिय पुढाकार घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील ८९ अभ्यास केंद्रांतील समन्वयक व लेखनिकांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रवेश प्रक्रियेबाबत बुधवारी ऑनलाईन कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी अध्यक्षपदावरून ते बोलत होते.

डॉ. पाटील म्हणाले, शिक्षण अपूर्ण राहिलेल्या तसेच नोकरी करत असलेल्या



व्यक्तींना दूरशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षणाची मोठी संधी उपलब्ध होत आहे. दूरशिक्षण हे कौशल्याधारित व रोजगाराभिमुख शिक्षण देणारे प्रभावी माध्यम असून, त्याचा अधिकाधिक प्रचार व प्रसार होणे आवश्यक आहे. पात्र विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अभ्यास केंद्र समन्वयकांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी डॉ. प्रवीण लोंढे यांनी प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्ज करताना आवश्यक बाबींविषयी डॉ. प्रसाद दावणे यांनी एबीसी-आयडी तयार करण्याबाबत, तर संतोष देवेकर यांनी डीईबी-आयडी तयार करण्याबाबत मार्गदर्शन केले. कार्यशाळेत बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए. तसेच ऑनलाईन एम.बी.ए., एम.एस्सी. (गणित) व एम.कॉम. या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

कार्यशाळेस उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर आदी उपस्थित होते. समन्वयक डॉ. चांगदेव बंडगर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश बेळीकट्टी यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सूर्यकांत गायकवाड यांनी आभार मानले.

2 1 MAY 2026

पुण्यनगरी



कोल्हापूर : पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी.

# पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते डॉ. ग. गो. जाधव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात हा कार्यक्रम झाला.

यावेळी अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे निवृत्त विभागप्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, अनुप जत्राटकर, अभिषेक पाटील, सूरज पुरी, उद्देश पाटील, सानिका भोरे, प्रवीण पांढरे, जान्हवी लायकर, साईप्रसाद आडके, सुप्रिया टाकळकर, सुप्रिया भोसले, मयूर कांबळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

2 1 MAY 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# पद्मश्री डॉ. ग. गो जाधव यांना विद्यापीठात अभिवादन

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठात पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र- कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते डॉ. ग. गो. जाधव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात हा कार्यक्रम झाला.

यावेळी अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे निवृत्त विभागप्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, अनुप जत्राटकर, अभिषेक पाटील, सूरज पुरी, उद्देश पाटील, सानिका भोरे, प्रवीण पांढरे, जान्हवी लायकर, साईप्रसाद आडके, सुप्रिया टाकळकर, सुप्रिया भोसले, मयूर कांबळे आदी उपस्थित होते.